शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
Government Medical College, Miraj
Miraj Pandharpur Road, Miraj, Dist.- Sangli - 416410.
Website: gmcmiraj.edu.in Email: deangmcmiraj@yahoo.co.in Phone: 0233/2232090-99 Fax: 0233-2231959

जा.क्रं.शावैममि/एच/कनिष्ठ निवासी/थेट मुलाखत/१३२२८ /२०२२ दिनांक :-०३.०१.२०२२

# WALK IN INTERVIEWS

नीट-पीजी २०२१ अंतर्गत प्रवेश प्रक्रिया अद्याप चालू झालेली नाही. त्यामुळे कनिष्ठ निवासी-१ ची पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत कोविड-१९ तिस-या लाटे अंतर्गत ओमीक्रॉन संसर्ग रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.यास्तव कोविड-१९ आपत्कालीन व्यवस्थापनांतर्गत (साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ आणि केंद्रिय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार) मिरज (कोविड-नॉन कोविड हॉस्पीटल) व सांगली (नॉन कोव्हीड) येथील दोन्ही रुग्णालयातील रुग्णसेवेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालू राहणेचे दृष्टीने, या महाविद्यालयातील कनिष्ठ निवासींची रिक्त पदे शैक्षणिक पात्रता/गुणवत्ता (एमबीबीएस अंतीम वर्षाच्या एकुण गुणानुसार)/ अनुभवानुसार स्थानिक निवड समिती मार्फत **दिनांक ०४.०१.२०२२ ते ३०.०४.२०२२ अखेर अथवा नीट-पीजी २०२१ अंतर्गत विद्यार्थी प्रवेशित होवून रुजू होईतोपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच्या कालावधीसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात तातडीने भरावयाची आहेत.**

तरी इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या आवश्यक त्या सर्व शैक्षणिक मूळ प्रमाणपत्रासह व त्यांच्या छांयाकीत प्रतीच्या एक सेटसह तसेच जे उमेदवार इतर ठिकाणी सेवेसाठी कार्यरत/रुजू असतील त्यांनी ना-हरकत प्रमाणपत्रासह खालील दिनांकास अधिष्ठाता कार्यालय, कॉलेज कौन्सील हॉल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे उपस्थीत रहावे.

१)मुलाखत दिनांक ०३.०१.२०२२ दुपारी ०३-०० वाजता
२)मुलाखत दिनांक ०४.०१.२०२२ दुपारी ०३-०० वाजता
३)मुलाखत दिनांक ०५.०१.२०२२ दुपारी ०३-०० वाजता
४)मुलाखत दिनांक ०६.०१.२०२२ दुपारी ०३-०० वाजता
५)मुलाखत दिनांक ०७.०१.२०२२ दुपारी ०३-०० वाजता

कनिष्ठ निवासी पदासाठी शैक्षणिक अर्हता पदवीपूर्व परिक्षा उत्तीर्ण/प्रथम प्राधान्य,शावैम.मिरज येथून उत्तीर्ण बंधपत्रित उमेदवारास तदनंतर इतर शा.वै.महाविद्यालयातून उत्तीर्ण उमेदवारास व तदनंतर खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्यक्रम राहील. तसेच विद्यावेतन नियमानुसार लागु राहिल. तसेच क.निवासींची आवश्यकतेनुसार रिक्त पदे भरण्यात आल्यास पुढील मुलाखत दिनांक रद्द समजण्यात यावा.

कनिष्ठ निवासींच्या रिक्त पदांमध्ये पदसंख्या कमी जास्त करणे/मुलाखती दिनांकातील बदलाबाबत तसेच प्रक्रिया रद्द बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे. सदर जाहिरात तसेच प्रक्रियेबाबतची वेळोवेळी अद्ययावत माहिती या महाविद्यालयाच्या संकेतस्थळ www.gmcmiraj.edu.in वर उपलब्ध आहे.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज

प्रति,
१) संकेतस्थळ www.gmcmiraj.edu.in वर
२) नोटीस बोर्ड- अधिष्ठाता कार्यालय/आय.एच.आर.होस्टेल/ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज.
३) नोटीस बोर्ड-बाहयरुग्ण विभाग/वैद्यकीय अधिक्षक कार्यालय शा.वै.म.रु.मिरज/प.व.पा.शा.रु.सांगली.
प्रत: अधिष्ठाता, पद्‌भूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली./शा.वै.महाविद्यालय,मिरज.
प्रत: जिल्हा शल्यचिकित्सक, पवपा.शासकीय रुग्णालय,सांगली/ वैद्यकीय अधिक्षक,शा. वै. म. व रुग्णालय,मिरज
प्रत: मा.आयुक्त व मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.